MHGO080016612022

**<u>न्यायनिर्णय</u>**

( घोषित दिनांक : २६/०९/२०२३ )

१. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याप्रमाणे युक्तिवाद ऐकल्यानंतर पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन निघतात. सदरील मुद्दयांना मी खालीलप्रमाणे सकारण उत्तर देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने अवैधरित्या २५६० किलो सडवा मोहपास जवळ बाळगल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **... नाही.** |
| **२.** | अंतिम आदेश ? | **... आरोपीला निर्दोष मुक्त केले.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u> :**

२. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द दोषारोप शाबीत करण्याकरीता पंच कैलाश दलपत सुरपामे (सा. क्र. १) या साक्षीदाराला तपासले. दुसरा पंच गणेश नंदकिशोर केशरवानी याला वेळोवेळी साक्ष संमन्स व वारंट काढुन देखील तो साक्षीकामी हजर झालेला नसल्याने त्याला तपासण्याचे वगळण्यात आले. त्यांनतर नि. क्र. १ वरील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

३. कैलाश (सा. क्र. १) हा जप्ती व घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी अभियोगपक्षाला समर्थन न करता त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून २५६० किलो सडवा मोहपास जप्त केल्याचे सपशेल नाकारले. दोन्ही पंचानी अभियोगपक्षाला समर्थन न केल्याने कथित जप्ती सिध्द होवू शकली नाही. तसेच जप्त द्रव हे दारूचे रसायन असल्याचे शाबीत होण्याकरिता रासायनिक शाळेकडील अहवाल न्यायालयात दाखल नाही. सबब रासायनिक अहवालाखेरीज ती बाब सिध्द होवू शकले नाही. त्यामुळे आरोपीने अवैधरित्या २५६० किलो सडवा मोहपास जवळ बाळगल्याचे सिध्द झाले नाही. सबब मी मुद्दा क्र. १ ला नकारार्थी उत्तर दिले. जप्त मुद्देमाल मोक्यावर नाश केल्याने त्याबाबत वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही. म्हणून मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालील अंतिम आदेश पारीत केला आहे.

## आदेश

१. आरोपींची महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५ (फ) च्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जुना जामीन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७—अ अन्वये पुढील तीन महिन्याकरीता अस्तित्वात राहिल व त्यानंतर तो रद्द समजण्यात यावा.

दिनांक : २६.०९.२०२३ ( डी. एस. वमने )
ठिकाण : तिरोडा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिरोडा.